## पाठ १२ घार हिंडते आकाशी

### ठळक मुद्दे

या पाठाच्या आधारे तुम्ही कालील गोष्टी समजून घेऊ शकाल –

१. प्रवास वर्णन या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये
२. प्रवासाचा उद्देश – प्रासंगिक, पर्यटन, भेटी, इ.
३. स्थलवर्णन – भौगोलिक वैशिष्ट्ये, ऐतिहासिकदृष्ट्या महत्व, सांस्कृतिक वारसा व त्याची वैशिष्ट्ये, अन्य विशेष, ठिकाणे पाहिल्यावर मनात आलेले विचार
४. व्यक्ती वैशिष्ट्ये - कार्यपद्धती, वागणूक, चालीरीती, जीवनमान, जगण्याची पद्धती, पेहराव, अन्न, या सर्वांची आपल्या पूर्वानुभावाशी सांगड व तुलना
५. लेखिकेचे व्यक्तिमत्व व जीवनदृष्टी – अनुभव वर्णन, त्यावेळी आलेले विचार, भावना, कल्पना, मते तुलना यातून व्यक्त होणे
६. लेखिकेची भाषाशैली – वरील सर्व घटकांतून दिसून येणे.

**प्रवास वर्णन** -आपण वेगवेगळया कारणांसाठी प्रवास करतो. कित्येकदा प्रवासात विविध प्रकारचे अनुभव येत असतात. कधी गमतीचे, तर कधी दु:खाचे तसेच अन्यही लक्षात राहणारे. कित्येकदा आपण जिथे जाणार असतो तो प्रदेश व प्रवास नवीन असतो. त्या प्रदेशाच्या संदर्भात अनेक गोष्टी समजून घ्यायला आपण उत्सुक असतो. आपण आपल्या प्रवास वर्णनात साधारणपणे तपशील सांगतो. उदा. कोठे, कसे, का, केव्हा गेलो इ. पण साहित्यिक मात्र त्यामधील अनुभवांचे वर्णन करतात. त्यात तपशील तर असतातच पण त्याच बरोबर त्यांना त्या त्या ठिकाणी जाणवलेली वैशिष्ट्ये, त्यावेळी त्यांच्या मनात आलेले विचार, भावना यांचेही चित्रण असते. हे चित्रण वाचून आपल्या सारख्या वाचकांच्या समोर ते सर्व दृश्य डोळयांसमोर उभे राहते, आपणही ते वाचताना त्याचा अनुभव घेत असतो असे वाटते. त्यामुळे उत्तम प्रवास वर्णनातून आपल्याला वेगळया प्रकारचा आनंद मिळतो. प्रत्येक लेखकाची अनुभव व्यक्त करण्याची पद्धती वेगळी असते. सिंधुताई सपकाळ यांच्या प्रवास वर्णनाचा अभ्यास करू या.

सिंधुताई सपकाळ हे महाराष्ट्राचे एक भूषण ठरावे असे एक व्यक्तिमत्व अनेकांची 'माय' होण्याचे स्वप्न ज्यांनी साकार केले आणि आपल्या अलौकिक कार्याने जगभर ज्यांना मान मिळाला अशा सिंधुताई सपकाळ यांचा एक अनुभव आपण अभ्यासणार आहोत.

सपकाळ यांच्या संदर्भात असलेली वेबसाईट उघडा. http://www.jejuri.in/social. त्यांच्या कर्तृत्वाचा परिचय करून घ्या. त्यांचे जीवनकार्य या लेखनात कसे व्यक्त झाले आहे, ते त्यांच्या अनुभवातून समजून घ्यायला आपल्याला मदत होईल. तेव्हा ह्या पाठाचा आपण दोन अंगानी विचार करणार आहोत- सिंधूताई यांचा एक श्रेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या म्हणून त्यांचे विचार समजून घेणे आणि दुसरे म्हणजे प्रवास वर्णनातील अनुभवांचे चित्रीकरण कसे करायचे त्याचा नमुना अभ्यासणे.

'घार हिंडते आकाशी' हा पाठ वाचा. पुढील मुद्द्यांच्या आधारे सिंधुताई यांनी चित्रित केलेल्या अनुभवाचे महत्व समजून घ्या.

**प्रवासाचा उद्देश -**

सिंधुताई सपकाळ यांच्या कार्यावर आधारित असणा-या 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तो सन्मान स्वीकारण्यासाठी त्या लंडनला गेल्या होत्या.

**प्रवासात भेटी दिलेल्या ठिकाणांचे वर्णन-** विमान प्रवास संपल्यावर लंडनला जाताना त्यांनी विविध ठिकाणे पाहिली त्यामध्ये हिथ्रो विमानतळ, हॉटेल, मादाम तुसाँचे प्रदर्शन, थेम्स नदीचा किनारा, या स्थळांचे वर्णन त्या करतात.त्या वर्णनात तेथील वैशिष्ट्यांची नोंद तर त्या करतातच पण त्यांचे वैशिष्ट्य असे की त्या सतत आपल्या व परकीय संस्कृतीची तुलना करतात.

हिथ्रो विमानतळावर उतरल्या उतरल्या लेखिकेला इतिहास आठवला. राय करण्यासाठी इतक्या दूरवर ही माणसे आली ह्याचे कौतुक वाटले, त्याच बरोबर मनावर दडपण आले, वेगळयाच जगात आल्याची जाणीव झाली. संमिश्र भावना मनात निर्माण झाल्या.

हॉ टेलवर आल्यानंतर तेथील स्त्रिया पाहिल्यावर त्यांच्या बद्दल कौतुक, आदर तर लेखिकेला वाटलाच पण त्यांच्यातील आईची मायाही जागृत आहे. म्हणून या मातांच्या मुलांचीही लगेचच त्यांना आठवण येते.

मादाम तुसाँचे प्रदर्शन पाहिल्यावर मेणाच्या माध्यमातून माणस जिवंत करणा-या कलेच मोठेपण त्यांना जाणवले.त्याचवेळी भारतीय माणसांचे पुतळे पाहिल्यावर पुन्हा महाराष्ट्राची आठवण झाली. आपण आपल्या प्रदेशात सुखी असतो असे त्या सूचित करतात.

थेम्स नदीच्या किना-यावर असणा-या इमारती व त्यामध्ये चालणारी करमणूक लेखिका सांगते.पण आवर्जून आपल्यासारखी रान, पाखर नसल्याचा उल्लेख केला आहे. आपल्या संस्कृतीमधील अनेक चांगल्या गोष्टींच्या आठवणी त्यांना विसरता येत नाही.माणसांच्या सुख-दु:खाशी समरस झालेल्या नद्यांचे वैशिष्ट्य त्या सांगतात.

**प्रवासात भेटलेल्या व्यक्ती-** तेथील व्यक्तींचे विशेष व त्याचे कौतुक करत्तात. सेकंदाच्या काट्यावर,वेळ पाळण्यासाठी पळत असलेली माणसे, स्वच्छता ठेवण्यारी बाई, आजीबाई गाईड या सा-यांची कर्तव्य तत्परता यांचा उल्लेख केल्यावाचून त्यांना राहवत नाही.काही माणसे शहराच्या स्वच्छतेसाठी झटत होती, कामात स्वत:ला झोकून देत होती.त्यांची ही कर्तव्य तत्परता पाहिल्यावर लेखिकेच्या मनात विचार येतात की ही माणसे स्वत:साठी जगत नसून देशासाठी जगतात.

**लेखिकेचे व्यक्तिमत्व –** त्यांचे आत्यंतिक देशप्रेम जागोजागी दिसून येते., पोरक्या मुलांची ओढ, तळमळ, त्यांच्या आनंदाचा ध्यास, असल्याचे त्यांच्या प्रत्येक वेळी आलेल्या आठवणींमधून प्रत्ययास येतो. लंडनला असूनही त्या या मुलांना विसरत नाही. म्हणून घार आकाशी हिंडते पण तिचे लक्ष मात्र जमिनीवरील पिल्लापाशी असते, तसे सिंधुताई यांचे व्यक्तिमत्त्व आहे. आईचे वात्सल्य पदोपदी जाणवते. .प्रत्येक गोष्टीचे बारकाईने केलेले निरीक्षण व त्या निरीक्षणांचा सतत अर्थ लावण्याची सवय त्यांचे वेगळेपण दर्शविते.स्वत:च्या कामावर निष्ठा आहे, कर्तव्यदक्षता आहे., मीपणा कुठेच दिसत नाही. निस्वार्थपणे त्या जीवन जगल्या आहेत हे त्यांच्या विचारांवरून दिसून येते. बलाढ्य राष्ट्राचे दडपण ,त्या संस्कृतीत स्वत:ला हरवल्याची जाणीव ,आपल्या संस्कृतीमधील चांगल्या .गोष्टींचा अभिमान त्याच वेळी अन्य संस्कृतीतील चांगलेपणा मोकळेपणाने मान्य करणे हे सर्व पैलू यातून दिसून येतात.

**लेखिकेची जीवनदृष्टी व्यक्त करणारी विधाने -** लेखिकेची जीवनदृष्टी ही त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांतून दिसून येते. त्याचा अर्थ लावा.

देशासाठी जगायला शिकायला हवे.,

माणूस म्हणून प्रत्येक जीवाला सांभाळा.,

माझ्या लेकरांच्या जगण्यासाठी जगले….. कुठला स्वार्थ न धरता., …लेकरांची पोट भरण्यासाठी पुन्हा भिक्षा मागायला मी तयार आहे.,

गावची ओढ सतावू लागली.,

एखाद दु:ख विसरण्यासाठी कामात हरवून जाणं तिच्यात मला दिसलं.

**लेखिकेची भाषाशैली**

वाचकांशी संवाद साधण्याची हातोटी दिसते.,

प्रश्न पडणे आणि त्याची उत्तरे शोधणारी वाक्य रचना आहे.,

….अशा पद्धतीने लेखन केल्यामुळे त्या त्या निमित्ताने अनेक विचारांचे तरंग मनात येत असल्याचे आपल्याला जाणवते.

कधी भावना उचंबळून येणे तर कधी विचारांचे प्राधान्य असणे असे सतत जाणवते.

**उजळणी प्रश्न**

अ. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

१.‘घार हिंडते आकाशी चित्त तिचं पिलांपाशी’ असं माझं झालय असे सिंधुताई का म्हणतात?

२. देशासाठी जगायला शिकायला हवं असे सिंधुताई का म्हणतात?

ब. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.

१. . सिंधुताई यांची ‘माय’ कोणकोणत्या प्रसंगातून दिसून येते? कशी?

२.दिवसभरातल्या लंडनदर्शनात सिंधुताई यांच्या मनात बरेच प्रश्न का घुटमळत राहिले असतील?

**मुक्त प्रश्न**

१.तुम्ही केलेल्या प्रवासाचे वर्णन १० ते १२ ओळीत करा.(प्रथम प्रवास वर्णन या संदर्भातील मुद्दे वाचा.)

२. तुमच्या एका परदेशी मित्राने आपल्या महाराष्ट्राला सार्वजनिक अस्वच्छतेसाठी खूप नावे ठेवली. तुमच्या त्या वेळी कोणत्या भावना होत्या? तुमच्या मनातील महाराष्ट्राबद्दलचा अभिमान कसा व्यक्त कराल?

(या प्रश्नाचा दोन प्रकारे विचार करा. एक-तुमच्या भावना म्हणजे आशय , दोन, साहित्य प्रकार म्हणजे अभिव्यक्तीचे स्वरूप, उदा. पत्रलेखन, इ-मेल )

३. मराठीमधील प्रवास वर्णन ह्या साहित्य प्रकारातील लेखन समृद्ध आहे. पु ल. देशपांडे, मीना प्रभू इ. साहित्यिकांची प्रवास वर्णने वाचा. प्रत्येकाच्या अनुभवाची वैशिष्ट्ये नोंदवा. त्यावरून ‘प्रवासवर्णन’ या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.